# आचारसंहितेचे पालन करा-आयुक्त

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक येत्या ऑक्टोबर महिन्यात पार पडणार असून या काळात २८ ऑगस्ट १९९५ नुसार आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी,असे आवाहन मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

निवडणूक आयोगाने बुधवारी ६ सप्टेंबरपासून राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता लगू केली आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मनपा आयुक्त कक्षात गुरुवारी बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, २८ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत भरारी पथक निर्माण करण्यात येणार आहे. निवडणुकीमध्ये पोलीस विभागाकडून देण्यात येणाऱ्या लाऊस्पीकर, सीच्या जागा आदी विषयी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत काळजी घ्यावी. तसेच शहरातील सर्व परवानाधारक मुद्रणालयाकडून छापील साहित्य जसे बॅनर, पॉम्प्लेट आदी छापत असताना मनपाकडून देण्यात आलेल्या प्रपत्रानसुसार प्रकाशक, (पान ३ वर.१)

**आचारसंहितेचे पालन...**

मुद्रणालयाचे नसाव, परवाना क्रमांक, कालावधी, प्रतीची संख्या आदी विषयी ठळक अक्षरात उल्लेख करणे अनिवार्य आहे. शहरातील विनापरवाना मुद्रण केल्याचे लक्षात आल्यास त्वरीत कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले.

# निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

## नांदेड महापालिकेसाठी परभणीहून दोन अधिकारी मागविले

**नांदेड, ता. ७ (बातमीदार)** : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिका निवडणुकीसाठी औरंगाबादच्या विभागीय आयुक्तांनी निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारीपदी अनुक्रमे उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. परभणीहून दोन अधिकारी मागविण्यात आले आहेत.

महापालिकेची येत्या ता. ११ आक्टोबरला निवडणूक होत असून राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेसाठी साधारणतः तीन ते चार प्रभागासाठी एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती करण्यास निर्देश दिलेले आहेत. सदरील निवडणूक निर्णय अधिकारी हे उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही, अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यास आदेशात नमूद केले आहे. त्याचबरोबर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (क्रमांक एक) म्हणून तहसीलदार संवर्गातील अधिकारी नियुक्ती करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचबरोबर क्रमांक दोन हा अधिकारी महापालिकेचा प्रभाग अधिकारी अथवा सहायक आयुक्त दर्जाचा तर क्रमांक तीनचा अधिकारी हा महापालिकेचा उपअभियंता किंवा सहाय्यक आयुक्त दर्जाचा अधिकारी आहे. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी गणेश देशमुख यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे ठिकाण आणि नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे-

१) आदिवासी चालक सभागृह, एस.टी. महामंडळ कार्यालय, वर्कशॉप - निवडणूक निर्णय अधिकारी - उपजिल्हाधिकारी संजय कुंडेटकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - तहसीलदार ए. पी. त्रिभुवन, क्षेत्रीय अधिकारी संजय जाधव आणि उपअभियंता दिलीप टाकळीकर.

२) जुने क्षेत्रीय कार्यालय, पाण्याच्या टाकीजवळ, गणेशनगर - निवडणूक निर्णय अधिकारी - उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - तहसीलदार अरविंद नरसीकर, क्रिकेट कोच शिवाजी डहाळे आणि उपअभियंता सुनील देशमुख.

३) क्षेत्रीय कार्यालय 'ब' श्री गुरू गोविंदसिंगजी स्टेडियम परिसर - निवडणूक निर्णय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष वेणीकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी संतोषी देवकुळे, सहायक आयुक्त माधवी मारकड आणि उपअभियंता प्रकाश कांबळे.

४) कापूस संशोधन केंद्र, हैदराबाद रोड, देगलूर नाका - निवडणूक निर्णय अधिकारी - जिल्हा पुनर्वसन अधिकारी महेश वडदकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - तहसीलदार किरण अंबेकर, उद्यान अधीक्षक फरहतुल्लाह बेग आणि उपअभियंता शिवाजी बाबरे.

५) महाराजा रणजितसिंग मार्केट, क्षेत्रीय कार्यालय, पहिला मजला, जुना मोंढा - निवडणूक निर्णय अधिकारी - उप विभागीय अधिकारी प्रदीप कुलकर्णी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - तहसीलदार सुरेखा स्वामी, क्षेत्रीय अधिकारी सुधीर इंगोले आणि उपअभियंता दिलीप आरसुडे.

६) स्थानिक संस्था कर कार्यालय, गांधी पुतळा, पाण्याच्या टाकीजवळ, वजिराबाद - निवडणूक निर्णय अधिकारी - उप विभागीय अधिकारी दीपाली मोतीयाळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - तहसीलदार सुरेश घोळवे, प्रभारी सहायक आयुक्त तानाजी कानोटे आणि उपअभियंता मनोहर दंडे.

७) साई मंगल कार्यालय, हडको बसस्टॉप जवळ, हडको - निवडणूक निर्णय अधिकारी - विशेष भूसंपादन उपजिल्हाधिकारी एस. डी. महिंद्रकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी - महसूल सहायक उज्वला पांगारकर, क्षेत्रीय अधिकारी अविनाश अटकोरे आणि उपअभियंता नरेंद्र सुजलेगावकर.